ePaper
उमेदवारांसाठी आनंदाची बातमी! प्रचाराची वेळ वाढली, निवडणूक आयोगाचा निर्णय

| वर्ष - 9 | अंक -96 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

आतील पानांत
- रोहित शर्माचा 'बिहारी बाबू' अवतार
- गौतम गंभीरच्या विधानावर BCCI नाराज
- कॉंग्रेसची धुरा सांभाळणार प्रियांका
- जम्मूतील दहशतवादी कट उधळला

www.mahaenews.com | शनिवार, दि. 29 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## फडणवीसांवर अप्रत्यक्ष निशाणा; इगतपुरी–भगूर सभेत प्रहार आणि आश्वासनांचा वर्षाव

# 'सीएमला सोन्याची शिंगे येतात का?'

## 'डीसीएम म्हणजे डेडिकेटेड टू कॉमन मॅन'; शिंदेंचा फडणवीसांवर अप्रत्यक्ष टोला



| नाशिक / इगतपुरी
:| प्रतिनिधी |
महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा शब्दांचे राजकारण तापले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाशिक आणि इगतपुरीतील सभांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर अप्रत्यक्ष निशाणा साधत वातावरण चांगलेच तापवले. "मी मुख्यमंत्री असताना लोक मला 'चीफ मिनिस्टर' म्हणायचे, पण मी नेहमीच सांगायचो की 'सीएम म्हणजे कॉमन मॅन'. मग 'चीफ मिनिस्टर' म्हटल्यावर सोन्याची शिंगे येतात आणि 'कॉमन मॅन' म्हटले की निघून जातात का?" असा कडवट, पण प्रहार करणारा सवाल त्यांनी उपस्थित केला.**

या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली असून, शिंदेंचा बाण फडणवीसांकडेच असल्याची चर्चा सभेतून निघताच जोर धरू लागली. त्यातच 'शिवसेना को हराना मुश्किल ही नहीं, नामुमकिन है' असा फिल्मी डायलॉग टाकत त्यांनी भाजपलाही कानपिचकून घेतले.

- नगरविकास शिंदेकडे, निधीअभावी कामे थांबणार नाहीत
- महायुतीच्या उमेदवारांना मतदानाची जोरदार विनंती
- विरोधकांच्या भकास विकासावर शाब्दिक हल्ला
- २ डिसेंबरला शिवसेनेला विजयी करा – शिंदेंचे आवाहन

### 'डीसीएम म्हणजे डेडिकेटेड टू कॉमन मॅन' – शिंदेंची भूमिका ठाम

सभेत शिंदे म्हणाले, "जनतेने मला 'डीसीएम' म्हणजे डिप्टी चीफ मिनिस्टर नव्हे, तर डेडिकेटेड टू कॉमन मॅन ही पदवी दिली आहे. माझ्या राजकारणाचा केंद्रबिंदू हा सर्वसामान्य माणूस आहे. राज्याचे भविष्य सर्वसामान्यांच्या हातात आहे आणि त्यांच्यासाठी दिलेला शब्द मी खडकासारखा पक्का पाळतो. एकनाथ शिंदे दिलेला शब्द म्हणजे काळ्या दगडावरची भगवी रेष."

नगरविकास, पाणीपुरवठा, उद्योग, पर्यटन अशी महत्त्वाची खाती शिवसेनेकडे असल्याचा उल्लेख करून त्यांनी नगरपालिकांच्या विकासाला निधीअभावी अडथळे येणार नाहीत, असे स्पष्ट आश्वासन दिले.

### भगूरच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही – शिंदे

भगूर येथे बोलताना शिंदे म्हणाले, "नगरविकास विभाग माझ्याकडे आहे. त्यामुळे भगूरच्या विकासासाठी जो काही निधी लागेल तो दिला जाईल. तुम्ही सांगाल ते काम मी करणारच. पण २ डिसेंबरला शिवसेनेला विजयी करणे गरजेचे आहे. तुमचा आशीर्वाद मिळाला तर विकासाचा वेग दुप्पट करू."

### इगतपुरीत विरोधकांवर तुफान हल्ला – 'सत्ता मिळाली, पण शहर भकास केले'

इगतपुरीतील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारसभेत शिंदेंचा स्वर अधिकच आक्रमक होता. "ही निवडणूक इगतपुरीच्या भवितव्याचा निर्णय करणारी आहे. अनेक वर्षे विरोधक सत्तेत होते, पण शहराचा विकास करण्याऐवजी भकासच केला," असा थेट आरोप त्यांनी विरोधकांवर केला.

ते पुढे म्हणाले, "इगतपुरी हे अत्यंत महत्त्वाचे आणि क्षमता असलेले शहर आहे. इच्छाशक्ती असली तर येथे मोठ्या प्रमाणात पर्यटन, उद्योग, नागरी सुविधा उभारता येतात. पण मुंबईत बसून इगतपुरीचा विकास होणार आहे का? काय दिवे लावलेत? काय सुविधा निर्माण केल्या? जनतेला फक्त आश्वासने दिली आणि शहराचा सत्यानाश केला."

निवडणूक धिंगाणा करताना त्यांनी भयमुक्त, भ्रष्टाचारमुक्त आणि गुंडगिरीमुक्त शहर उभारण्याची हमी दिली.

### महायुतीकडून सर्वांगीण विकासाचे आश्वासन

शिंदे म्हणाले, "नगरविकास, अर्थ, उद्योग, पर्यटन, तसेच अल्पसंख्याक विभाग—या सर्व विभागांच्या माध्यमातून इगतपुरीचा सर्वांगीण विकास करण्यात येईल. महायुती आल्यास शहराला नवे प्रकल्प, नवे उद्योग, नवी रोजगारसंधी मिळतील." त्यांच्या मंचावर महायुतीतील स्थानिक नेते आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. संजय खातळे, फिरोजभाई पठाण, गोरख बोडके, ज्ञानेश्वर लहाने, रघुनाथ तोकडे, माजी सभापती संपतराव काळे, तालुकाध्यक्ष पांडुरंग वारुंगसे, पांडुरंग शिंदे आदींची उपस्थिती सभेला बळकटी देणारी ठरली.

### निधीआभावी विकास रोखू न देण्याचे आश्वासन

राजकीय तज्ज्ञांच्या मते, महायुतीतील अंतर्गत स्पर्धा, स्थानिक असंतोष आणि दोन्ही पक्षांचे स्वतंत्र राजकीय आकांक्षांचे सावट शिंदेंच्या भाषणात दिसून आले. त्यांनी दिलेल्या आश्वासनांनी इगतपुरी–भगूर मतदारांमध्ये उत्सुकता निर्माण केली असली, तरी विरोधकांनीही शिंदेंच्या टीकेला प्रत्युत्तर देण्यासाठी जोरदार तयारी केली आहे.

### राजकीय वातावरण तापले; २ डिसेंबरवर सर्वांचे लक्ष

इगतपुरी व भगूर नगरपरिषद निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू असताना उपमुख्यमंत्री शिंदेंनी केलेल्या विधानांनी वातावरण अधिक तापवले आहे. 'सीएमला सोन्याची शिंगे येतात का?' या संतप्त शैलीतील प्रश्नाने महाराष्ट्राचे राजकारण चांगलेच हलले आहे.

पुणेकरांचा प्रवास सुखकर!

## मोहोळ यांच्याकडून ट्वीट करत अभिनंदन

# मेट्रोच्या नवीन मार्गिकेला मंजूरी!

## मोदींची 10 हजार कोटींची भेट

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणेकरांसाठी आनंदाची बातमी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने आज पुणे मेट्रोच्या ३१.६ किलोमीटर अंतराच्या दोन विस्तारित मार्गिकांना मान्यता दिली आहे. त्यामुळे पुणे मेट्रो शहराच्या चारही बाजूला विस्तारणार असून पुण्याची सार्वजनिक वाहतूक अधिक सुरक्षित, आरामदायी आणि वेगवान होणार आहे.**



शहरातील मेट्रो मार्गाच्या विस्तारासाठी खासदार व केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पाठपुरावा केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने या प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आला होता. मेट्रो मार्गांच्या मंजुरीसाठी मोहोळ यांनी नगरविकास मंत्री मनोहर लाल खट्टर यांची नुकतीच भेट घेतली होती. बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात मार्गिका क्रमांक 4 – खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला व मार्गिका क्रमांक 4 अ नळस्टॉप-वारजे-माणिकबाग या दोन मार्गिकांचा समावेश आहे. या दोन्ही मार्गिकांसाठी हडपसर हे इंटरचेंज स्थानक असेल.

या दोन्ही उन्नत (एलिव्हेटेड) मार्गिकांची एकत्रित लांबी ३१.६० किलोमीटर असून त्यावर एकूण २८ स्थानके असतील. यासाठी ९८५७ कोटी ८५ लाख रुपये खर्च अपेक्षित असून हे काम पाच वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. पुण्यासाठी खराडी-खडकवासला (मार्गिका ४) आणि नळ स्टॉप-वारजे-माणिकबाग (मार्गिका ४अ) मार्गांनी मोदी सरकारची मंजुरी! पुणे मेट्रो रेल नेटवर्कच्या फेज-२ अंतर्गत लाइन ४ (खडकी–खडकवासला) आणि लाइन ४अ (नळ स्टॉप–वारजे–माणिक बाग) या दोन्ही मार्गांना मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पामध्ये ₹९,८५७.८५ कोटींची तरतूद असून, पुढील ५ वर्षांत हे काम पूर्ण होणार आहे.या मार्गांना मंजुरी मिळावी यासाठी नुकतीच केंद्रीय नगरविकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांची भेट घेऊन पाठपुरावा केला होता. या विस्तारामुळे ३१.६ किमीचे नवे नेटवर्क, २८ एलिव्हेटेड स्टेशन तयार होतील ज्यामुळे IT हब, व्यावसायिक परिसर, कॉलेजेस आणि प्रमुख निवासी भागांना अधिक वेगवान कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. नवीन लाईन्समुळे खडकी, नळस्टॉप, वारजे, माणिक बाग आणि डेक्कन–स्वारगेट परिसराला प्रचंड फायदा होणार असून पुणेकरांसाठी ही खरोखरच मोठी GOOD NEWS आहे ! या मंजुरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय नगरविकास मंत्री मनोहरलाल खट्टर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे समस्त पुणेकरांच्या वतीनं मनःपूर्वक धन्यवाद ! पुणेकरांसाठी आनंदाची बातमी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने आज पुणे मेट्रोच्या ३१.६ किलोमीटर अंतराच्या दोन विस्तारित मार्गिकांना मान्यता दिली आहे.

त्यामुळे पुणे मेट्रो शहराच्या चारही बाजूला विस्तारणार असून पुण्याची सार्वजनिक वाहतूक अधिक सुरक्षित, आरामदायी आणि वेगवान होणार आहे. शहरातील मेट्रो मार्गाच्या विस्तारासाठी खासदार व केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पाठपुरावा केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने या प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आला होता. मेट्रो मार्गांच्या मंजुरीसाठी मोहोळ यांनी नगरविकास मंत्री मनोहर लाल खट्टर यांची नुकतीच भेट घेतली होती. बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात मार्गिका क्रमांक 4 – खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला व मार्गिका क्रमांक 4 अ नळस्टॉप-वारजे-माणिकबाग या दोन मार्गिकांचा समावेश आहे. या दोन्ही मार्गिकांसाठी हडपसर हे इंटरचेंज स्थानक असेल. या दोन्ही उन्नत (एलिव्हेटेड) मार्गिकांची एकत्रित लांबी ३१.६० किलोमीटर असून त्यावर एकूण २८ स्थानके असतील.

### ५ वर्षांत हे काम पूर्ण होणार

पाच वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.पुण्यासाठी खराडी-खडकवासला (मार्गिका ४) आणि नळ स्टॉप-वारजे-माणिकबाग (मार्गिका ४अ) मार्गांनी मोदी सरकारची मंजुरी ! पुणे मेट्रो रेल नेटवर्कच्या फेज-२ अंतर्गत लाइन ४ (खडकी–खडकवासला) आणि लाइन ४अ (नळ स्टॉप–वारजे–माणिक बाग) या दोन्ही मार्गांना मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पामध्ये ₹९,८५७.८५ कोटींची तरतूद असून, पुढील ५ वर्षांत हे काम पूर्ण होणार आहे.

# पुरंदर विमानतळ भूसंपादनाला वेग

## भूसंपादनाच्या मान्यतापत्राला पुढील 2–3 दिवसांत मंजुरीची शक्यता

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादन प्रक्रियेला अखेर गती मिळण्याची शक्यता असून पुढील दोन ते तीन दिवसांत अधिकृत मान्यतापत्र मिळेल, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली. मान्यतापत्र आल्यानंतर शेतकऱ्यांसोबत बैठका घेऊन नुकसान भरपाईचा अंतिम दर निश्चित केला जाणार आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंदाजे १५ दिवसांत प्रत्यक्ष भूसंपादनाला सुरुवात होईल.**



डूडी यांनी सांगितले की, विमानतळासाठी आवश्यक असलेल्या अंदाजे १,२५० हेक्टर जमिनीसाठी शेतकऱ्यांनी आधीच संमती दर्शविली आहे. याशिवाय, प्रकल्प नकाशाबाहेरील सुमारे २४० हेक्टर जमीन देखील शेतकऱ्यांनी देण्याची तयारी दाखवली आहे. विमानतळासाठी लागणाऱ्या जमिनीची संपूर्ण मोजणी प्रशासनाकडून पूर्ण करण्यात आली आहे. भूसंपादनासाठी तयार करण्यात आलेला नुकसान भरपाई अहवाल ११ नोव्हेंबर रोजी राज्य सरकारकडे सादर करण्यात आला होता. राज्य सरकारने मंजुरी दिल्यानंतर हा प्रस्ताव उद्योग विभागाकडे पाठविण्यात आला असून त्यांनीही त्याला हिरवा कंदील दिला आहे. ही प्रक्रिया महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) कायद्याच्या कलम ३२(१) अंतर्गत करण्यात येत आहे. या प्रस्तावात किती आणि कोणती जमीन भूसंपादित करायची आहे याची सविस्तर माहिती समाविष्ट आहे.अधिक माहिती देताना डूडी म्हणाले की, दोन दिवसांपूर्वी उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनवलगन यांच्यासोबत चर्चा झाली. उद्योग विभागाने जिल्हा प्रशासनाच्या ३२(१) प्रस्तावाला अंतिम मान्यता दिली आहे.

### विमानतळासाठी लागणारी जमीन

आवश्यक असल्यास आणखी एक बैठकही आयोजित केली जाईल. दर निश्चित झाल्यानंतर अंदाजे दोन आठवड्यांच्या आत प्रत्यक्ष भूसंपादनाची अंमलबजावणी सुरू होईल.पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सात गावांमधील एकूण १,२८५ हेक्टर (सुमारे ३,००० एकर) जमीन संपादित केली जाणार आहे. यापैकी १,२५० हेक्टरसाठी शेतकऱ्यांची संमती मिळालेली आहे, तर सुमारे ५० हेक्टर क्षेत्रासाठी मंजुरी अद्याप प्रलंबित आहे. नकाशाबाहेरील २४० हेक्टरसाठीही सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने भूसंपादनाची प्रक्रिया अधिक सुकर झाली आहे.

जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान

## सायन्स पार्कमध्ये रोबोटिक्स एक्सलन्स सेंटर

# कोडिंगपासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत प्रशिक्षण!

### विद्यार्थ्यांसाठी ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही सुरू, सप्ताहांत कार्यशाळांतून प्रत्यक्ष अनुभवाची संधी

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क आणि प्लॅनेटेरियमच्या पुढाकाराने नागरी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रात कोडिंग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार असून ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली आहे.**




कार्यक्रमास सायन्स पार्कचे संस्थापक संचालक प्रवीण तुपे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रद्धा खंपरिया, लीडरशिप फॉर इक्विटीचे संस्थापक मधुकर रेड्डी आणि रोबोटेक्स इंडियाच्या पायल मनन उपस्थित होते. हा उपक्रम लीडरशिप फॉर इक्विटी आणि रोबोटेक्स इंडियाच्या सहकार्याने राबविण्यात आला आहे.

रोबोटिक्स लॅबमध्ये विद्यार्थ्यांना बेसिक ते ॲडव्हान्स कोडिंगचे प्रशिक्षण दिले जाणार असून, शनिवार, रविवार आणि संध्याकाळच्या वेळेत विशेष कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहेत. या सुविधा महापालिका तसेच खासगी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी खुल्या आहेत.

> “ महापालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले, “कृत्रिम बुद्धिमत्तेचे आणि नवीन तंत्रज्ञानाचे शिक्षण ही काळाची गरज आहे. काही देशांमध्ये हे शिक्षण प्राथमिक स्तरापासून सुरू होते. पिंपरी-चिंचवडमध्ये अशी सुविधा उपलब्ध होणे ही मोठी पावले आहे.”
> **-शेखर सिंह,** महापालिका आयुक्त

**रोबोटिक्स व एआयचे प्रशिक्षण शहरातील विद्यार्थ्यांसाठी सुरू सप्ताहांत विशेष कार्यशाळा,**

**महापालिका व खासगी शाळांना प्रवेश विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धांसाठी तयार करण्याचे उद्दिष्ट**

---

# खोदकामामुळे डिलक्स चौक-काळेवाडी रस्त्याची दुरवस्था

### नागरिक त्रस्त; अपघातांचा धोका वाढला, महापालिकेकडे तातडीच्या दुरुस्तीची मागणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**ˈडिलक्स चौक ते काळेवाडी मुख्य रस्त्यावर महापालिकेच्या जलनिस्सारण वाहिनीच्या कामानंतर रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. गेल्या महिनाभरापासून रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने खड्डे आणि चिखलामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील रहिवाशांनी तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली असून, अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.**

काळेवाडी मुख्य रस्ता हा वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. दररोज हजारो वाहने आणि पादचारी या मार्गाने प्रवास करतात. मात्र, खोदकामानंतर रस्त्याची पृष्ठभाग दुरुस्त न झाल्याने पावसाळ्यात खड्ड्यांची संख्या वाढली आहे. चिखलामुळे दुचाकी घसरून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत.

स्थानिक रहिवासी म्हणाले, “महापालिकेने रस्ता खोदला, पण तो पुन्हा नीट करण्याची तसदी घेतली नाही. पावसामुळे खड्डे आणि चिखल वाढले आहेत, यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत.”

कायदा काय सांगतो? महाराष्ट्र महापालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ६३ आणि ६४ नुसार रस्ते, गटारे आणि पाणीपुरवठा यांसारख्या पायाभूत सुविधांची देखभाल आणि दुरुस्ती करणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. खोदकामानंतर रस्त्याची दुरुस्ती न करणे हे या तरतुदींचे उल्लंघन मानले जाते.

**खड्डे आणि चिखलामुळे वाहतूक विस्कळीत**

**महापालिकेच्या हलगर्जीपणावर नागरिक संतप्त**

**तातडीने दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

# मग दोघेही मतभेद सोडून एकत्र



## भूमिका

**लोकसभा निवडणुकांची घोषणा झाली आणि 'मातोश्री' चे जवळचे शिलेदार अनिल परब कट्टर काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड यांच्या संपर्कात होते. वर्षाताईंनी मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघातून लढावे आणि शिवसेना ठाकरे पक्षाला दक्षिण मध्य मुंबई सोपवावा, असा प्रस्ताव होता. निवडणूक अवघड होती. नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा सत्तेवर येणार असे भाकीत केले जात होते.**

मान न झुकवता, न लढता हार मानायला शिवसेना (उद्धव ठाकरे) तयार नव्हती, कारणही तसेच होते. भाजप नावाच्या महाशक्तीने त्यांचा पक्षच फोडला होता. त्याचा हिशेब चुकता करण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या शिलेदारांनी लोकसभा जिंकायची ठरवले होते. दलित मुस्लिम मतपेढीवर अधिराज्य गाजवणाऱ्या काँग्रेसला ठाकरे यांना मुख्यमंत्री करण्यात अडचण वाटत होती. शिवसेना हिंदुत्ववादी होती. पण राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत सहभागी होणार म्हणून काँग्रेसचे आमदार हटून बसले. मग दोघेही मतभेद सोडून एकत्र आले. या घडामोडीमुळे अचानक जवळ आलेली दलित-मुस्लिम मतपेढी सोडायची नाही, या निकराने शिवसेना वागू लागली. मोदींना आव्हान देण्यात यशस्वी झालेले उद्धव ठाकरे मुस्लिम समुदायाला आवडू लागले. काँग्रेसला हिंदुत्ववादी मते मिळण्याची शक्यता होती




आणि शिवसेनेला दलित-मुस्लिम मतपेढी, वर्षा गायकवाड आणि शिवसेनेचे अनिल देसाई दोघेही लोकसभेला जिंकले. हे समीकरण केवळ या दोन जागांवरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात यशस्वी झाले. काँग्रेसकडे मुस्लिमांची मतपेढी होती ती बावरी दाचा पडण्यापूर्वी. त्यानंतर ही मते कधी समाजवादी पार्टी कधी एमआयएम अशा अनेक पक्षांमध्ये फिरत होती. मोदींच्या उदयानंतर पुन्हा एकदा ध्रुवीकरणाच्या मुंबईच्या राजकारणात काँग्रेस शिवसेना समीकरण नवीन वळणावर आले आहे. दलित-मुस्लिम मतपेढीबाबत शिवसेनेच्या (ठाकरे) नव्या रणनीतीमुळे काँग्रेसची चिंता वाढली आहे. अपेक्षेने मुस्लिम मतदार काँग्रेसकडे परतत होते. त्या परत प्रवासामध्ये आता उद्धव ठाकरे शिवसेना नावाचा जो थांबा अचानक लागला, तो मुस्लिम मतदारांना आवडू लागला. त्यामुळे काँग्रेस जागी झाली आहे.

मुंबईतले परप्रांतीय हिंदू हिंदी भाषिक भाजपच्या 'काऊ बेल्ट'मधील यशामुळे त्यांच्याकडे वळले, मुस्लिमांना हाताशी धरून ठेवणे काँग्रेससाठी भाग होते. काँग्रेसचा मुंबईवर एकछत्री अंमल केव्हाच संपला होता, कदाचित त्यांना तो ठेवायचाच नव्हता, काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला मदत केली अन् सेना वाढली, याच्या कहाण्या दर टाकून यावेळी मात्र काँग्रेस सावध झाली आहे. आपली मतपेढी शिवसेनेला सोपवायची नाही, यासाठीच्या हालचाली मुंबईत सुरू झाल्या आहेत. काँग्रेसला मुंबईत २० टक्के मतदारांचा प्रतिसाद मिळत असे. ६० ते ७० वॉर्डांमध्ये काँग्रेसचे उमेदवार लक्षणीय मते घेतात आणि मुंबईत काँग्रेस त्या जोरावर स्वतःपुरते काय ते मिळवते. ते आता सेनेमुळे इतिहासजमा होऊ नये असे नेत्यांना वाटतेय. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला जो प्रचंड फटका बसला, राज्यभरात जेमतेम १६ आमदार निवडून आले.

काँग्रेसची मते मिळवण्याची टक्केवारी १५ ते १६ टक्क्यांच्या आसपास असायची, ती या निवडणुकीत १२ टक्क्यांवर घसरली. शिवसेना ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार गट बरोबर होते. मात्र शिवसेना आपल्या मतपेढीत शिरतेय हे लक्षात आलेल्या काँग्रेसने आता सावध पावले टाकायला सुरुवात केलेली दिसते. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे राहुल गांधी यांच्या जवळचे कार्यकर्ते आहेत. या मंडळींनी व्होट चोरीसारख्या अनेक प्रकरणांच्या आधारे भाजपसमोर आव्हान निर्माण करायचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत.

पुढच्या पिढ्यांसाठी काँग्रेसला तयार करा, असेही धोरण पक्षाने स्वीकारलेले दिसते. सपकाळ आणि वर्षा गायकवाड हे दोघेही त्या गटातील सक्रिय नेते असल्यामुळे मुंबईत शिवसेनेबरोबर जायचे नाही, असे सध्या तरी त्यांनी ठरवलेले दिसते. मैत्री तोडायची तर त्यासाठी कारण शोधणे आवश्यक. ठाकरे बंधू एकत्र येणार या चर्चेमुळे काँग्रेसला सध्या तात्कालिक कारण मिळाले. आम्ही कायदा हातात घेणाऱ्या लोकशाहीविरोधी पक्षाबरोबर नाही, असे मनसेचे नाव घेत काँग्रेसने सुरू केले आहे.

## असे कसे ?

### वय कसं ओळखतात?


***बीजिंग इथं पार पडलेल्या ऑलिम्पिक सामन्यांच्या वेळी जिम्नास्टिक्स स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या चिनी मुलींच्या वयासंबंधी वाद निर्माण झाला होता.***

ऑलिम्पिक सामन्यांच्या घटनेनुसार १६ वर्षांपेक्षा लहान व्यक्तीला सामन्यात भाग घेता येत नाही; आणि काही चिनी मुलींचं वय त्यापेक्षा कमी असल्याची शंका इतर देशातील स्पर्धकांनी किंवा अधिकाऱ्यांनी व्यक्त केली होती. चिनी व्यक्तीची चण पाश्चात्त्यांपेक्षा लहानखुरी असते; पण ते ध्यानात घेऊनही काही मुली १६ वर्षांच्या असणं शक्य वाटत नव्हते. स्त्रियांच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन त्या जिंकणाऱ्या रशियन किंवा पूर्व जर्मनीच्या मुलींबद्दलही त्या आधीच्या ऑलिम्पिक सामन्यांच्या वेळी, त्या स्त्रियाच आहेत की काय अशी शंका उत्पन्न केली गेली होती; आणि त्याचा निवाडा त्या मुलींच्या रक्तातील पेशी घेऊन त्यातील गुणसूत्रांच्या आधारावर केला गेला होता. तसंच एखादी स्पर्धा जिंकणाऱ्या व्यक्तीनं अधिक ताकद मिळविण्यासाठी किंवा स्नायूंची मूलभूत क्षमता वाढविण्यासाठी उत्तेजक पदार्थ घेतले आहेत की नाही याचाही निवाडा वैज्ञानिक चाचण्या घेऊन केला गेला आहे.

केंद्र व राज्यातील कामगार कल्याणाचे २९ कायदे वेगळे काढले. ते संरक्षणाचे दर्जेदार नियम होते. ती चौकट कामगारांच्या आयुष्याचे सुरक्षाकवच होती. त्याऐवजी चार एकत्रित संहिता आणल्या. सुलभीकरणाच्या नावाखाली प्रत्यक्षात कामगारांच्या हकांचे तुकडे केले. वेतन संहिता ही किमान वेतनाची कागदी हमी आहे.

# चार कामगार संहिता, शोषणाचा नवा अजेंडा...!

भा रत सरकारने २०२० मध्ये चार कामगार संहिता मंजूर केल्या. त्यांच्या अंमलबजावणीवर २१ नोव्हेंबर रोजी शिकामोर्तब केलं. त्यांना कामगार हिताचे परिवर्तन म्हटलं. प्रत्यक्षात हा बदल कामगार संरक्षणाचे कवच संपविणारा. भांडवलदारांच्या नफ्याला खतपाणी घालणारा, सत्तेत येण्यास अच्छे दिन आनेवाले है! असे खोटे स्वप्न दाखविले होते. त्या आठवणी ताज्या झाल्या, मोदी सरकार आता परिवर्तन होनेवाला है. म्हणतं. ही भ्रमनिर्मिती आहे. देशातील प्रमुख कामगार संघटना विरोधात आहेत. हे कायदे कामगारांचे हक्क कमकुवत करतात. हे सरकार भांडवल धार्जिणी आहे. तिची शोषणाची ही नवी नीती आहे. ओव्हरटाइमची मर्यादा वाढली. मात्र भरपाई कमी. यातून कामगारांचा थकवा वाढणार अन् मालकांचा फायदा होणार. औद्योगिक संबंध संहिता संघटना संपवणारा कायदा ठरणार. नव्या संहितेने संघटनांनाच लक्ष्य केले. ३०० पेक्षा कमी कामगार असलेल्या कारखान्यात




कामगार संघटनेला मनाई असणार. कामगार कपातीसाठी शासकीय परवानगीची गरज संपली. फिक्स्ड टर्म एम्प्लॉयमेंटमुळे सहा महिने, नव महिन्यांच्या करारावर कामगार ठेवता येणार. अन् त्यांना सहजपणे काढता येणार, संघटना स्थापन्याचा अधिकार हिरावल्याने कामगारांचा सामुदायिक आवाज दाबला. हे सर्व मालकांसाठी मनमानीची मुभा आहे. कामगारांसाठी नौकऱ्या अनिश्चित, आवाज गुदमरलेला अशी स्थिती निर्माण करते. ट्रेड युनियन महासंघांनी या संहितांना कामगार लोकशाहीवरील आघात म्हटले. सामाजिक सुरक्षा संहिता हा असंघटित क्षेत्रासाठी गाजावाजा आहे. भारताच्या कामगार शक्तीपैकी ९० टक्के कामगार असंघटित क्षेत्रात आहेत. त्यात प्रवासी मजूर, बांधकाम कामगार, गिग वर्कर्स, कृषी मजूर, डिलिव्हरी बॉयज आहेत. त्यांच्या सामाजिक सुरक्षेबाबत ही संहिता प्रत्यक्षात काहीही देत नाही. गिग वर्कर्सना विम्याच्या आश्वासनाचा उल्लेख आहे. तो प्रत्यक्षात अंमलात येईल का? आतापर्यंतचा अनुभव सांगतो. नाही. उबर ड्रायव्हर, झोमॅटो डिलिव्हरी बॉय, ई-कॉमर्स कामगार यांच्याकडे कामाच्या तासांची मर्यादा नाही. अपघात संरक्षण नाही. उत्पन्नाची गॅरंटी नाही. आता या संहितेने त्यांना केवळ कागदावर मान्यता दिली. सुरक्षेचे आश्रय नाही. व्यावसायिक सुरक्षेच्या नावाखाली कामगारांच्या कामाच्या तासांत वाढ केली. नवीन संहितेतील तरतुदीनुसार १० ते १२ तासांचे काम आहे. ओव्हरटाइमची मुभा आहे. मात्र भरपाई कमी आहे. यामुळे अपघात, हृदयविकार, मानसिक तणाव वाढणार. कामगारांचे आयुष्य, आरोग्य, कुटुंब या सर्वांची गळचेपी ही संहिता करते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## २१ जानेवारीला सुनावणी

## जि.प . आणि पालिका निवडणूक घोषणेला परवानगी

# उमेदवारांना सुप्रीम दिलासा!

## आरक्षण नव्याने होण्याची शक्यता



।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ओबीसी आरक्षणाची मर्यादा भंग झाल्याने सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेल्या खटल्यात आज कोणत्याही निवडणुका रद्द करण्याची आमची मानसिकता नसल्याचे स्पस्ट करीत सर्वोच्च न्यायालयाने पालिका निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या हजारो उमेदवारांना दिलासा दिला असून २१ जानेवारी २०२६ रोजी अंतिम सुनावणी ठेवली आहे.**

स्थानिक स्वराज्य संस्थेत ओबीसी आरक्षण टाकताना पन्नास टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली म्हणून सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेल्या खटल्यात आजच्या सुनावणीत नेमके काय होणार याची प्रतीक्षा लागून होती आज न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी टेन्शन वाढलेल्या हजारो उमेदवारांना दिलासा देत अंतिम सुनावणी २१ जानेवारी २०२६ रोजी ठेवली असून कोणत्याही निवडणुकीला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. राज्यातील सगळ्या सरहणीक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या निवडणुका ठरलेल्या वेळेत पार पाडाव्या यासाठी ज्या निवडणुका आता जाहीर होतील त्या सगळ्या निवडणुका २१ जानेवारी २०२६ रोजी जाहीर होणाऱ्या निर्णयाला बांधील असतील असे स्पस्ट केले आहे. कोणत्याही परिस्थिती ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडता काम नये यावर न्यायालय ठाम आहे ,त्यामुळे सध्या ज्या पालिका निवडणुका होत आहेत त्या सुद्धा आगामी निकालाच्या अधीन असतील असेही कोर्टाने सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका ३१ जानेवारी पूर्वी घेण्याचे आदेश यापूर्वी दिले आहेत त्यामुळे राज्य निवडणूक आयोग ठरलेल्या सर्व निवडणुका जाहीर करण्यात कोणतंही अडचण नाही , मात्र सगळ्यांना पन्ना टक्के आरक्षण मर्यादा लागू असेल असेही स्पस्ट केले आहे. आता पुढील वर्षी होणारी सुनावणी तीन न्यायाधीशांच्या बेन्चपुढे होणार आहे. वाशिमचे विकास किसनराव गवळी यांनी आरक्षण मर्यादा वाढल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून दिले होते. ओबीसी आरक्षणाची मर्यादा भंग झाल्याने सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेल्या खटल्यात आज कोणत्याही निवडणुका रद्द करण्याची आमची मानसिकता नसल्याचे स्पस्ट करीत सर्वोच्च न्यायालयाने पालिका निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या हजारो उमेदवारांना दिलासा दिला असून २१ जानेवारी २०२६ रोजी अंतिम सुनावणी ठेवली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत ओबीसी आरक्षण टाकताना पन्नास टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली म्हणून सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेल्या खटल्यात आजच्या सुनावणीत नेमके काय होणार याची प्रतीक्षा लागून होती आज न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी टेन्शन वाढलेल्या हजारो उमेदवारांना दिलासा देत अंतिम सुनावणी २१ जानेवारी २०२६ रोजी ठेवली असून कोणत्याही निवडणुकीला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. राज्यातील सगळ्या सरहणीक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या निवडणुका ठरलेल्या वेळेत पार पाडाव्या यासाठी ज्या निवडणुका आता जाहीर होतील त्या सगळ्या निवडणुका २१ जानेवारी २०२६ रोजी जाहीर होणाऱ्या निर्णयाला बांधील असतील असे स्पस्ट केले आहे. कोणत्याही परिस्थिती ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडता काम नये यावर न्यायालय ठाम आहे ,त्यामुळे सध्या ज्या पालिका निवडणुका होत आहेत त्या सुद्धा आगामी निकालाच्या अधीन असतील असेही कोर्टाने सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका ३१ जानेवारी पूर्वी घेण्याचे आदेश यापूर्वी दिले आहेत

### टांगती तलवार कायम

राज्य निवडणूक आयोग ठरलेल्या सर्व निवडणुका जाहीर करण्यात कोणतंही अडचण नाही , मात्र सगळ्यांना पन्ना टक्के आरक्षण मर्यादा लागू असेल असेही स्पस्ट केले आहे. आता पुढील वर्षी होणारी सुनावणी तीन न्यायाधीशांच्या बेन्चपुढे होणार आहे. वाशिमचे विकास किसनराव गवळी यांनी आरक्षण मर्यादा वाढल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून दिले होते.

# मुंबईत मोठ्या होर्डिंग्जवर बंदी!

## आता 40x40 फुटांपेक्षा मोठे होर्डिंग्ज लावता येणार नाहीत

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई महानगरपालिका (MUMBAI MUNICIPAL CORPORATION) क्षेत्रात जाहिरातींसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने (BMC) नवीन जाहिरात फलक (होर्डिंग) धोरण २०२५ (NEW HOARDING POLICY 2025) जारी केले आहे. या नवीन धोरणानुसार, आता ४०X४० फुटांपेक्षा मोठ्या आकाराचे होर्डिंग्ज लावता येणार नाहीत.**

जांच समितीच्या शिफारशीनंतर बीएमसीने या नवीन धोरणाची घोषणा केली आहे. या नवीन नियमांनुसार, भविष्यात अपघात घडण्यास कारणीभूत ठरू शकणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींना आता परवानगी दिली जाणार नाही. मुंबई शहरात आता ४०X४० फुटांपेक्षा मोठ्या आकाराच्या जाहिरात फलकांना परवानगी नसेल.

फुटपाथवर तसेच इमारतींच्या छतांवर जाहिराती प्रदर्शित करण्यास परवानगी नाही. डिजिटल जाहिरात फलकांची (DIGITAL HOARDINGS) चमक (LUMINANCE RATIO) 3:१ च्या प्रमाणापेक्षा अधिक ठेवता येणार नाही. झिलमिलणाऱ्या (FLICKERING) जाहिराती प्रदर्शित करण्यास परवानगी



नसेल.मॉल्स, मल्टीप्लेक्स, शॉपिंग कॉम्प्लेक्स, व्यावसायिक इमारती (COMMERCIAL BUILDINGS) आणि पेट्रोल पंपावर एलईडी (LED) जाहिरात फलक प्रदर्शित करता येतील. निर्माणाधीन (UNDER CONSTRUCTION) किंवा दुरुस्तीचे काम चालू असलेल्या इमारतींच्या कंपाऊंड वॉल आणि इमारतींच्या बाहेरील भागावर व्यावसायिक आणि अव्यावसायिक दोन्ही प्रकारच्या जाहिराती प्रदर्शित करता येतील.नवीन स्वरूप: महानगरपालिकेने प्रथमच काही नवीन आकारांच्या फलकांना परवानगी दिली आहे. यापुढे एकेरी (SINGLE) आणि पाठपोट (BACK TO BACK) फलकांसोबतच 'व्ही' (V) आणि 'एल' (L) आकार तसेच त्रिकोणी (, चौकोनी , पंचकोनी (PENTAGON VISION) आणि षटकोनी (HEXAGON VISION) स्वरूपाच्या जाहिरात फलकांनाही परवानगी दिली जाईल. बंधन: मात्र, या नवीन आकारांच्या फलकांसाठी वाहतूक पोलिसांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' (NOC) घेणे बंधनकारक असेल. इतर ठिकाणी जाहिरात: याव्यतिरिक्त, बांधकाम सुरू असलेल्या आणि दुरुस्तीची कामे सुरू असलेल्या इमारतींच्या कुंपणावरतसेच बाह्यभागावर व्यावसायिक आणि अव्यावसायिक जाहिराती लावता येतील.

### घाटकोपर दुर्घटनेनंतर निर्णय

१३ मे २०२४ रोजी घाटकोपर येथे १२० स्क्वेअर फूट आकाराचे एक भलेमोठे होर्डींग कोसळले होते. तर ७० लोक जखमी झाले होते. या दुर्घटनेच्या सखोल चौकशीनंतर आणि भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला नवीन जाहिरात धोरण तयार करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

## रशीद अल्वी यांचे वक्तव्य

## प्रियांका गांधी यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घ्यावीत

# काँग्रेसची धुरा सांभाळणार

## राजकीय वर्तुळात खळबळ

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सर्वात जुना राजकीय पक्ष असलेल्या काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा नेतृत्वाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत, हे प्रश्न विरोधी पक्षाकडून नाही तर काँग्रेस पक्षातीलच एका प्रमुख नेत्याकडून आले आहेत. ज्येष्ठ काँग्रेस नेते रशीद अल्वी यांनी पक्षाच्या सध्याच्या स्थितीबद्दल चिंता व्यक्त करणारे एक महत्त्वाचे विधान जारी केले आहे. त्यांनी प्रियांका गांधी यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घ्यावीत असे सुचवले आहे. त्यांच्या विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे, कारण त्यांनी सध्याच्या कार्यशैलीवर थेट टीका केली आहे.**



रशीद अल्वी यांनी संघटनेची स्थिती दयनीय असल्याचे वर्णन करताना म्हटले आहे की यासाठी काँग्रेस नेतृत्व थेट जबाबदार आहे. त्यांचा असा विश्वास आहे की काँग्रेस पक्ष त्यांच्या निवडणूक प्रयत्नांना आणि तयारींना साजेसा करण्यात अपयशी ठरत आहे, तर भाजप जमिनीवर अथक परिश्रम करत आहे. त्यांनी एक महत्त्वपूर्ण निरीक्षण केले की राहुल गांधींना भेटणे आता काँग्रेस नेत्यांसाठीही सोपे राहिलेले नाही. जुन्या काळाची आठवण करून देताना ते म्हणाले की इंदिरा गांधींना भेटणे पूर्वी खूप सोपे होते, परंतु आज वरिष्ठ नेतेही तेवढे खुले नाहीत.प्रियंका गांधींचे समर्थन करणारे रशीद अल्वी म्हणाले की, त्या त्यांच्या आजी इंदिरा गांधी यांची प्रतिमा स्पष्टपणे प्रतिबिंबित करतात. त्यांनी यावर भर दिला की आज पक्षातील वरिष्ठ नेते दुर्लक्षित वाटतात आणि त्यांना जबाबदारी नाकारली जाते. अल्वी यांच्या मते, काँग्रेसला बळकटी देण्यासाठी असंतुष्ट किंवा बाजूला पडलेल्या नेत्यांना मुख्य प्रवाहात परत आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पक्षातील वरिष्ठ व्यक्तींकडे दुर्लक्ष केल्याने संघटना आतून कमकुवत होत आहे आणि हे नेतृत्वाच्या अभावामुळे आहे.केवळ केंद्रीय नेतृत्वाबाबतच नाही तर अल्वी यांनी कर्नाटकातील सुरू असलेल्या राजकीय रस्सीखेचावरही आपले मत व्यक्त केले. कर्नाटकात मुख्यमंत्रीपदावरून सुरू असलेला संघर्ष चिंताजनक असल्याचे त्यांनी सांगितले. राहुल गांधी नव्हे तर मल्लिकार्जुन खरगे हे काँग्रेस पक्षाचे प्रमुख आहेत, त्यामुळे त्यांनी हा प्रश्न लवकरात लवकर सोडवावा, असे अल्वी यांनी स्पष्ट केले. राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे आणि भाजपचे उदाहरण देत ते म्हणाले की, प्रत्येक पक्षाला चढ-उतारांचा सामना करावा लागतो, परंतु कर्नाटकात सरकार स्थापनेदरम्यान झालेल्या अडीच वर्षांच्या करारावरून डीके शिवकुमार आणि सिद्धरामय्या यांच्यात सुरू असलेला वाद संपवणे महत्त्वाचे आहे.शातील सर्वात जुना राजकीय पक्ष असलेल्या काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा नेतृत्वाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत, हे प्रश्न विरोधी पक्षाकडून नाही तर काँग्रेस पक्षातीलच एका प्रमुख नेत्याकडून आले आहेत. ज्येष्ठ काँग्रेस नेते रशीद अल्वी यांनी पक्षाच्या सध्याच्या स्थितीबद्दल चिंता व्यक्त करणारे एक महत्त्वाचे विधान जारी केले आहे. त्यांनी प्रियांका गांधी यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घ्यावीत असे सुचवले आहे. त्यांच्या विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे, कारण त्यांनी सध्याच्या कार्यशैलीवर थेट टीका केली आहे.रशीद अल्वी यांनी संघटनेची स्थिती दयनीय असल्याचे वर्णन करताना म्हटले आहे की यासाठी काँग्रेस नेतृत्व थेट जबाबदार आहे. त्यांचा असा विश्वास आहे की काँग्रेस पक्ष त्यांच्या निवडणूक प्रयत्नांना आणि तयारींना साजेसा करण्यात अपयशी ठरत आहे, तर भाजप जमिनीवर अथक परिश्रम करत आहे. त्यांनी एक महत्त्वपूर्ण निरीक्षण केले की राहुल गांधींना भेटणे आता काँग्रेस नेत्यांसाठीही सोपे राहिलेले नाही. जुन्या काळाची आठवण करून देताना ते म्हणाले की इंदिरा गांधींना भेटणे पूर्वी खूप सोपे होते, परंतु आज वरिष्ठ नेतेही तेवढे खुले नाहीत.प्रियंका गांधींचे समर्थन करणारे रशीद अल्वी म्हणाले.

### पक्षातील वरिष्ठ व्यक्तींकडे दुर्लक्ष

यावर भर दिला की आज पक्षातील वरिष्ठ नेते दुर्लक्षित वाटतात आणि त्यांना जबाबदारी नाकारली जाते. अल्वी यांच्या मते, काँग्रेसला बळकटी देण्यासाठी असंतुष्ट किंवा बाजूला पडलेल्या नेत्यांना मुख्य प्रवाहात परत आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पक्षातील वरिष्ठ व्यक्तींकडे दुर्लक्ष केल्याने संघटना आतून कमकुवत होत आहे आणि हे नेतृत्वाच्या अभावामुळे आहे.

# जम्मूतील मोठा दहशतवादी कट उधळला

## सुरक्षा यंत्रणा सतर्क; 19 वर्षीय संशयित दहशतवादी अटकेत

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**काही दिवसांपूर्वीच राजधानीत दिल्लीत बॉम्बस्फोट झाला. त्यानंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. असे असताना आता जम्मूमध्ये दहशत निर्माण करण्याचा कट उधळून लावत पोलिसांनी संशयित दहशतवादी मोहम्मद साजिद (वय १९) याला अटक केली आहे. साजिदला पाकिस्तान आणि इतर देशांमधील त्याच्या सूत्रधारांकडून मोबाईल फोनद्वारे सूचना मिळत होत्या.**

पोलिसांनी त्याला अटक केली असून, गुरुवारी त्याला सहा दिवसांच्या रिमांडवर घेतले आहे. साजिदच्या चौकशीच्या आधारे जम्मूमधील अनेक ठिकाणी छापे टाकण्यात आले. पोलिसांच्या माहितीनुसार, साजिदचे वडील रियासी येथील रहिवासी असून, सीआरपीएफमध्ये आहेत आणि सध्या दिल्लीत तैनात आहेत. असलमचे कुटुंब तीन वर्षांपूर्वी जम्मूतील बथिंडी येथे स्थलांतरित झाले.



साजिद तरुणांना कट्टरतावादी बनवण्याचे काम करत असल्याचे समोर आले होते. बुधवारी रात्री अकराच्या सुमारास पोलिसांनी त्याला जम्मूतील सुजवान येथील एका चौकीवर अटक केली. दहशतवादी कारवायांशी संबंधित एनएसएच्या कलमांखाली त्याच्याविरुद्ध बहु फोर्ट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान, अटक केलेल्या साजिदचे वडील मोहम्मद असलम हे मूळचे रियासी जिल्ह्यातील जेडी पंडाल येथील रहिवासी आहेत. २०११ मध्ये त्यांनी १४ वर्षांपूर्वी गीता नगरमध्ये घर बांधले. संपूर्ण कुटुंब तिथे राहत होते. मोहम्मद साजिद जम्मूमध्ये एका मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट रचत होता. तो पाकिस्तान आणि अनेकांशी संपर्कात होता. पोलिसांना सीमेपलीकडून कनेक्शन असल्याचा संशय आहे. याचा तपशीलही शेअर केला. तो कधी आणि कोणती माहिती शेअर करत होता हे ठरवण्यासाठी ते इतर देशांमधील विशिष्ट फोन नंबर तपासत आहेत.

जम्मूमध्ये दहशतवादी कट रचल्याच्या कारणावरून अटकेत असलेला मोहम्मद साजिद तरुणांना ऑनलाईन कट्टरतावादी बनवत होता.

त्याच्या दहशतवादी कटाची माहिती मिळविण्यासाठी पोलिसांनी गुरुवारी त्याला सहा दिवसांच्या रिमांडवर घेतले. त्याच्या चौकशीच्या आधारे पोलिसांनी जम्मूमधील अनेक ठिकाणी छापेही टाकले.

### सूत्रधारांकडून फोनद्वारे सूचना

राजधानीत दिल्लीत बॉम्बस्फोट झाला. त्यानंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. असे असताना आता जम्मूमध्ये दहशत निर्माण करण्याचा कट उधळून लावत पोलिसांनी संशयित दहशतवादी मोहम्मद साजिद (वय १९) याला अटक केली आहे. साजिदला पाकिस्तान आणि इतर देशांमधील त्याच्या सूत्रधारांकडून मोबाईल फोनद्वारे सूचना मिळत होत्या.

# जॉनी लिवर यांनी केला मोठा खुलासा



१९९३ साली 'बाजीगर' हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि सुपरहिट ठरला. 'बाजीगर'मधील शाहरुख खानने साकारलेली खालनायकाची भूमिका आजही चित्रपटसृष्टीतील त्याच्या करिअरचा एक महत्त्वाचा टप्पा मानली जाते. त्यावेळी चित्रपटसृष्टीत नवीन असलेल्या शाहरुखसाठी ही भूमिका साकारणे एक मोठे आव्हान होते. परंतु ही नकारात्मक भूमिका साकारत तो एक चतुरस्त्र अभिनेता आहे हे त्याने सगळ्यांसमोर सिद्ध केले. या चित्रपटात शाहरुखच्या कामाचं तर कौतुक झालंच, पण याबरोबरच इतरही कलाकार भाव खाऊन गेले. काजोलचं काम लोकांनी डोक्यावर घेतलं, या चित्रपटातून शिल्पा शेट्टीने चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं.

# वयाच्या 14 व्या वर्षापासून लागले ड्रग्जचे व्यसन

बॉलिवूड स्टार किड्सना चित्रपटांमध्ये फारसे यश मिळत नसले तरी त्यांचे वैयक्तिक आयुष्य नेहमीच चाहत्यांमध्ये चर्चेचा विषय असते. आज अशाच एका स्टार किडचा वाढदिवस आहे, ज्याचे वडील आणि आई दोघेही बॉलिवूड स्टार होते. तरुणपणी ड्रग्जच्या व्यसनाला बळी पडलेल्या या स्टार किडचे आयुष्य चढ-उतारांनी भरलेले आहे. मजबूत शरीरयष्टी, देखणा देखावा आणि प्रभावशाली कुटुंब असूनही तो बॉक्स ऑफिसवर सुपरहिट हिरो बनू शकला नाही. अनेक चित्रपटांमध्ये काम करूनही नशिबाने त्याला साथ दिली नाही. बॉलीवूडचे दिग्गज अभिनेते राज बब्बर यांचा मुलगा प्रतीक बब्बर आज त्याचा ३९ वा वाढदिवस साजरा करत आहे. प्रतीक बब्बरने अलीकडेच त्याची जुनी मैत्रीण प्रिया बॅनर्जीशी दुसरे लग्न केले. त्याचे वडील राज बब्बर किंवा त्याचा भाऊ आर्य बब्बर हे दोघेही या लग्नाला उपस्थित नव्हते. चाहत्यांनी प्रश्न उपस्थित केले तेव्हा कुटुंबातील तणावाचे थर उलगडू लागले. प्रतीकने त्याचे वडील, भाऊ आणि बहीण जुही बब्बर यांना लग्नाचे आमंत्रण पाठवले नसल्याचे उघड झाले. त्यानंतर आर्य आणि जुही यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, काही व्यक्तींच्या कटामुळे कुटुंबात अशी दरी निर्माण झाली आहे. आर्य बब्बर म्हणाले की, त्याला आमंत्रित केले नव्हते हे समजण्यासारखे असले तरी, त्याच्या वडिलांनाही आमंत्रित करायला हवे होते. प्रतीक बब्बरचे प्रिया बॅनर्जीशी हे दुसरे लग्न आहे. त्यांनी यापूर्वी २३ जानेवारी २०१९ रोजी सान्या सागरशी लग्न केले होते.

# सोनालीचे तिखट भाष्य




मराठी सिनेसृष्टीत आपले वेगळं स्थान निर्माण करणारी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी सध्या चर्चेत आहे. सोनाली सध्या दाक्षिणात्य चित्रपटात काम करत आहे. अभिनयासोबत आपल्या सडेतोड मतांसाठी सोनाली चर्चेत आली होती. आता पुन्हा एकदा तिने सडेतोड भाष्य केले आहे. एखाद्या पुरुष कलाकाराने यश मिळवले की त्याची मेहनत आहे असे म्हणतात. मात्र, स्त्रीचे हे यश हे नेहमी इतरांचे उपकार असल्याचे दर्शवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे सोनाली कुलकर्णीने म्हटले. सोनाली कुलकर्णी ही मल्याळम चित्रपट 'मलायकोट्टाई वालीबान'या चित्रपटात काम करत आहे. या चित्रपटात दाक्षिणात्य सुपरस्टार मोहनलालप्रमुख भूमिकेत आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने सोनाली कुलकर्णीने 'नवभारत टाइम्स'सोबत संवाद साधला. त्यावेळी तिने आपली सडेतोड मते व्यक्त केली.सोनालीने एका प्रश्नाला उत्तर देताना म्हटले की, जेव्हा एक मुलगी स्वत: घर, कार खरेदी करते किंवा ती एखादी गोष्ट आपल्या मेहनतीने साध्य करते तेव्हा तिच्याकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाते. एखाद्या राजकारण्याने भेट दिली असेल, एखाद्या निर्मात्याने ती दिली असेल, कदाचित ती विशेषाधिकाराने मिळाली असेल म्हटले जाते. जेव्हा एखादी स्त्री मिळवते तेव्हा तिला विशेषाधिकार म्हणतात आणि जेव्हा तोच पुरुष मिळवतो तेव्हा ते त्याचे यश असल्याचे म्हटले जाते.

# विठ्ठल उमप स्मृती यांना 'मृदगंध पुरस्कार

लोककलेसाठी आपले आयुष्य समर्पित केलेल्या संगीत नाटक अकादमी, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त महाराष्ट्र शिरोमणी लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित १५ वा लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृती संगीत समारोह आणि 'मृदगंध पुरस्कार २०२५' च्या दिमाखदार समारंभात विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात आले.पुरस्कार वितरणाच्या समारंभात गझलनवाझ भीमराव पांचाळे यांनी त्यांच्या भावना व्यक्त करत सांगितले, "मी मातीतला माणूस असून, लोककलेने माझे भरणपोषण केले. आज लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या नावाचा जीवनगौरव पुरस्कार मिळत असल्याचा आनंद अनमोल आहे. 'निहाल हो गयी जिंदगी मेरी' अशा शब्दांत मी आपली कृतज्ञता व्यक्त करतो." आपले अवघे आयुष्य लोककलेसाठी समर्पित करणाऱ्या संगीत नाटक अकादमी, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त महाराष्ट्र शिरोमणी लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांना 'मृदगंध पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षीच्या मृदगंध पुरस्कार विजेत्यांमध्ये शाहीर श्राजेंद्र राऊत (लोककला क्षेत्र),प्रदीप शिंदे (शिल्पकला), अभिनेते जयवंत वाडकर (अभिनय क्षेत्र), परेश मोकाशी (दिग्दर्शक), श्रीमती मधुगंधा कुलकर्णी (अभिनेत्री आणि निर्माती), अभिनेत्री रिंकू राजगुरू (नवोन्मेष प्रतिभा-अभिनय क्षेत्र) यांना 'मृदगंध पुरस्कार २०२५' देऊन सन्मानित करण्यात आले. लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या नावाचा हा पुरस्कार आमच्यासाठी लाखमोलाचा असल्याची भावना मान्यवर पुरस्कार विजेत्यांनी व्यक्त केली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार, अर्थतज्ज्ञ-माजी खासदार भालचंद्र मुणगेकर, भाजपचे मुंबई अध्यक्ष आमदार अमित साटम, यांच्यासह संगीत त्यांच्या चिरंजीव, प्रसिद्ध गायक आणि विठ्ठल उमप फाऊंडेशनचे अध्यक्ष नंदेश वत्सला विठ्ठल उमप यांनी उपस्थितांचे आभार मानले, "रसिक मायपाब आणि कुटुंबाच्या साथीने मी माझ्या बाबांना आठवणीतून जिवंत ठेवू शकलो. बाबांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराच्या निमित्ताने आपले ऋणानुबंध आणि रसिकांचे प्रेम आमच्यावर असंच कायम राहू द्या." या वेळी सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनीही भाष्य केले,"लोकशाहीर विठ्ठल उमप यांचा पहाडी आवाज हा महाराष्ट्राच्या चळवळीचा आवाज होता. वंचितांच्या आवाजाचं प्रतिनिधित्व करत त्यांनी लोककलेच्या माध्यमातून जो संघर्ष उभा केला, ते अत्यंत कौतुकास्पद आहे.

# काजोल ट्विंकलच्या केमिस्ट्रीने जिंकली मने!



भारताची आवडती एंटरटेनमेंट डेस्टिनेशन बनलेल्या प्राइम व्हिडिओने आपल्या अनस्क्रिप्टेड ओरिजिनल मालिकेच्या 'टू मच विथ काजोल अँड ट्विंकल' पहिल्या सीझनच्या अभूतपूर्व यशाचा उत्सव साजरा केला आहे. या पदार्पणातील सीझनने प्रेक्षकांचे भरघोस प्रेम मिळवत प्राइम व्हिडिओवरील सर्वाधिक पाहिली जाणारी अनस्क्रिप्टेड मालिका म्हणून विक्रम नोंदवला आहे. विशेष म्हणजे, हा टॉक शो भारतभरातील 93% पेक्षा जास्त पिनकोडपर्यंत पोहोचला, ज्यामुळे त्याची लोकप्रियता आणि पोहोच स्पष्टपणे जाणवते.या टॉक शोचे सूत्रसंचालन काजोल आणि ट्विंकल खन्ना यांनी केले असून त्याचे निर्मितीकार्य बनिजे आशिया यांनी केले आहे. सामान्य सीझनमध्ये सलमान खान, आमिर खान, अक्षय कुमार, सैफ अली खान, आलिया भट्ट, कृति सेनन, वरुण धवन, करण जोहर आणि असे अनेक मोठे बॉलिवूड तारे सहभागी झाले होते. याशिवाय विशेष भागात क्रिकेट वर्ल्ड कप चॅम्पियन्स जिमिमा रोड्रिग्ज आणि शेफाली वर्मा यांनीही हजेरी लावली होती. भारतात आणि जगातील 240+ देश आणि प्रदेशांमध्ये स्ट्रीम होत असल्याने टू मच विथ काजोल अँड ट्विंकल हा सर्वात चर्चेत असलेल्या शोमधील एक ठरला असून प्राइम व्हिडिओवरील सर्वात यशस्वी अनस्क्रिप्टेड मालिका म्हणून ओळख मिळवली आहे. निखिल माधोक, डायरेक्टर आणि हेड ऑफ ओरिजिनल्स, प्राइम व्हिडिओ इंडिया म्हणाले, "टू मच विथ काजोल अँड ट्विंकलला मिळालेला जबरदस्त प्रतिसाद हे सिद्ध करतो की या शोने टॉक शोच्या दुनियेत एक ताजे आणि नाविन्यपूर्ण दृष्टीकोन आणला आहे आणि त्यामुळेच तो प्राइम व्हिडिओवरील आतापर्यंतचा सर्वात जास्त पाहिला गेलेला अनस्क्रिप्टेड शो बनला आहे." ते पुढे म्हणाले, या शोची खासियत म्हणजे आमच्या होस्ट्सची अद्वितीय जोडी,ज्या पूर्ण मोकळेपणाने आणि बेधडकपणे आपले विचार मांडतात. त्यांची अप्रतिम केमिस्ट्री एकमेकांसोबत आणि सेलिब्रिटी पाहुण्यांसोबत संपूर्ण देशभर चर्चा घडवते, वेगळे आणि ठळक दृष्टिकोन समोर आणते आणि त्यामुळे हा शो खरोखरच हेडलाईनमध्ये राहणारा ठरला आहे."ट्विंकल खन्ना म्हणाली, "थेट सांगायचे झाले तर, काजोल आणि ट्विंकलसोबतचे 'टू मच' म्हणजे जणू आपल्या मित्रांसोबत बसल्यासारखे, जेथे वातावरण अगदी घरासारखे असते.राहू शकतो, मनातील गोष्टी बोलू शकतो आणि त्या आठवणी आठवू शकतो ज्या सहसा फक्त मनाच्या कोपऱ्यातच राहतात. सत्य बोलणे आणि मोकळेपणाने व्यक्त होणे हे आमच्या शोचे खरे आकर्षण आहे. हे सर्व लोकांपर्यंत पोहोचताना, त्यांचे लक्ष वेधताना, प्रेम मिळवताना आणि आमच्या शोतील गोष्टींवर चर्चा सुरू करताना पाहणे अत्यंत आनंददायी आणि प्रेरणादायी आहे." काजोल पुढे म्हणाली, "माझ्या करिअरच्या बहुतांश काळात मी प्रश्नांची उत्तरे देणारी होते,मुलाखत घेणारी नाही.

व्हिडिओ व्हायरल!

कॅप्टन कूलच्या अंदाजाने चाहते फिदा

# रोहित शर्माचा ‘बिहारी बाबू’ अवतार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका (IND VS SA) यांच्यात तीन सामन्याची वनडे मालिका ३० नोव्हेंबरपासून खेळवण्यात येणार आहे. त्यासाठी भारतीय संघ रांची शहरात पोहचला आहे. संघात रोहित शर्मा (ROHIT SHARMA) असल्यामुळे मैदान आणि सोशल मीडिया गाजणार हे तर नक्कीच आहे. दरम्यान, ‘हिटमॅन’ रोहित शर्माचा रांचीमध्ये बिहारी अंदाज सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. सुरक्षा रक्षकांच्या गराड्यात असलेल्या रोहितच्या तोंडून जेव्हा स्थानिक भाषेतील शब्द बाहेर पडले, तेव्हा उपस्थितांना हसू आवरले नाही. खुद्द रोहितही आपल्या बोलीवर खळखळून हसला.**

## उपस्थितांना हसू आवरले नाही



नेमके झाले असे की, रोहित शर्मा एअरपोर्टवर सुरक्षा कर्मचाऱ्यांसोबत चालत होता. समोरून त्याला रिसिव्ह करण्यासाठी माजी क्रिकेटपटू शहाबाज नदीम आले, पण सुरक्षा रक्षकांनी नदीमला अडवण्यास सुरुवात केली. नदीमला पाहताच रोहित शर्मा बिहारी अंदाजात बोलला. त्याने विनोदी स्वरात म्हटले, “अरे भाई ई तो हमरा दोस्त है (अरे भाऊ, हा तर माझा मित्र आहे).” रोहितचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर खूप वेगाने व्हायरल होत आहे आणि चाहत्यांना त्याचा हा ‘कॅप्टन कूल’ अंदाज चांगलाच आवडला आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील पहिला सामना रांचीमध्येच होणार आहे, त्यासाठी रोहित शर्मा शहरात दाखल झाला आहे.रोहित शर्माचा वनडे क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा रेकॉर्ड नेहमीच दमदार राहिला आहे. हिटमॅनने प्रोटियाज संघाविरुद्ध आतापर्यंत एकूण २६ वनडे सामने खेळले आहेत. या दरम्यान खेळलेल्या २५ डावांमध्ये रोहितने ३३ च्या सरासरीने ८०६ धावा ठोकल्या आहेत. त्याच्या नावावर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तीन शतके आणि दोन अर्धशतके नोंद आहेत.यापूर्वी, ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळल्या गेलेल्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतही रोहितने जबरदस्त फलंदाजी केली होती. त्याने ३ सामन्यांत १०१ च्या सरासरीने २०२ धावा केल्या होत्या,ज्यात एक शतक आणि एका अर्धशतकाचा समावेश होता.तिसऱ्या वनडेत रोहितने १२१ धावांची अविस्मरणीय खेळी केली होती.आता रोहित शर्माकडून आता दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेतही दमदार कामगिरीची अपेक्षा आहे.भारत आणि दक्षिण आफ्रिका (IND VS SA) यांच्यात तीन सामन्याची वनडे मालिका ३० नोव्हेंबरपासून खेळवण्यात येणार

## अरे भाई ई तो हमरा दोस्त है

या दरम्यान खेळलेल्या २५ डावांमध्ये रोहितने ३३ च्या सरासरीने ८०६ धावा ठोकल्या आहेत. त्याच्या नावावर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तीन शतके आणि दोन अर्धशतके नोंद आहेत. यापूर्वी, ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळल्या गेलेल्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतही रोहितने जबरदस्त फलंदाजी केली होती. त्याने ३ सामन्यांत १०१ च्या सरासरीने २०२ धावा केल्या होत्या, ज्यात एक शतक आणि एका अर्धशतकाचा समावेश होता. तिसऱ्या वनडेत रोहितने १२१ धावांची अविस्मरणीय खेळी केली होती.

आहे. त्यासाठी भारतीय संघ रांची शहरात पोहचला आहे. संघात रोहित शर्मा (ROHIT SHARMA) असल्यामुळे मैदान आणि सोशल मीडिया गाजणार हे तर नक्कीच आहे. दरम्यान, ‘हिटमॅन’ रोहित शर्माचा रांचीमध्ये बिहारी अंदाज सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. सुरक्षा रक्षकांच्या गराड्यात असलेल्या रोहितच्या तोंडून जेव्हा स्थानिक भाषेतील शब्द बाहेर पडले, तेव्हा उपस्थितांना हसू आवरले नाही. खुद्द रोहितही आपल्या बोलीवर खळखळून हसला. नेमके झाले असे की, रोहित शर्मा एअरपोर्टवर सुरक्षा कर्मचाऱ्यांसोबत चालत होता. समोरून त्याला रिसिव्ह करण्यासाठी माजी क्रिकेटपटू शहाबाज नदीम आले, पण सुरक्षा रक्षकांनी नदीमला अडवण्यास सुरुवात केली. नदीमला पाहताच रोहित शर्मा बिहारी अंदाजात बोलला. त्याने विनोदी स्वरात म्हटले, “अरे भाई ई तो हमरा दोस्त है (अरे भाऊ, हा तर माझा मित्र आहे).” रोहितचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर खूप वेगाने व्हायरल होत आहे आणि चाहत्यांना त्याचा हा ‘कॅप्टन कूल’ अंदाज चांगलाच आवडला आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील पहिला सामना रांचीमध्येच होणार आहे, त्यासाठी रोहित शर्मा शहरात दाखल झाला आहे.रोहित शर्माचा वनडे क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा रेकॉर्ड नेहमीच दमदार राहिला आहे. हिटमॅनने प्रोटियाज संघाविरुद्ध आतापर्यंत एकूण २६ वनडे सामने खेळले आहेत.

# गौतम गंभीरच्या विधानावर BCCI नाराज

## नवीन वर्षातील मोठी परीक्षा! अयशस्वी झाला तर हातातून पद जाणार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर हे सतत टीकेच्या भोवऱ्यात असतात. त्यांच्यावर भारतीय कसोटी क्रिकेटचा नाश केल्याचा आरोप होत आहे. बीसीसीआय कदाचित त्यांच्याविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याच्या मनःस्थितीत नसेल, परंतु त्यांच्यावरील डॅमोकल्सची तलवार पूर्णपणे उठलेली नाही.**



बीसीसीआयच्या सूत्रांनी हिंदुस्तान टाईम्सला सूचित केले आहे की कोलकात्याच्या खेळपट्टीबाबत गौतम गंभीरच्या विधानावर बोर्ड नाराज आहे. त्यांच्याविरुद्ध तात्काळ कोणतीही कारवाई न करण्याचे कारण “पर्यायांचा अभाव” आहे. त्यांची सर्वात मोठी परीक्षा पुढील वर्षाच्या सुरुवातीच्या महिन्यांत आहे. जर गौतम गंभीर त्यात अपयशी ठरला तर त्यांना काढून टाकले जाऊ शकते. गौतम गंभीरने ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीचे जाहीरपणे समर्थन केले, जिथे कसोटी सामना फक्त अडीच दिवसांत संपला. इतिहासात पहिल्यांदाच, भारतातील कसोटी सामन्यात दोन्ही संघांनी चारही डावात २०० धावा केल्या नाहीत.भारतीय संघ १२४ धावांचे लक्ष्य गाठण्यात अपयशी ठरला, दुसऱ्या डावात ९३ धावांवर गारद झाला आणि ३० धावांनी पराभव पत्करावा लागला. ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीवर अनेक तज्ञ आणि माजी क्रिकेटपटूंनी तीव्र टीका केली होती, परंतु गौतम गंभीरने उघडपणे त्याचे समर्थन केले. गंभीर म्हणाला, “आम्हाला नेमकी हीच खेळपट्टी हवी होती. क्युरेटर खूप, खूप मदतगार आणि आधार देणारे होते. ही खेळपट्टी आम्हाला हवी होती आणि आम्हाला मिळालीही. जेव्हा तुम्ही चांगले खेळत नाही तेव्हा असेच घडते.”

## खराब कामगिरीची चौकशी

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतील खराब कामगिरीचीही बोर्ड चौकशी करत आहे. बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने एचटीला सांगितले की, “व्हाईट-बॉल हंगाम संपल्यानंतर या मुद्द्यांवर सखोल चर्चा केली जाईल.अधिकाऱ्याने संकेत दिला की गौतम गंभीरचे भविष्य आता २०२६ च्या टी-२० विश्वचषकातील भारतीय संघाच्या कामगिरीवर अवलंबून असेल.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। सोमवार ।
। दि. 25 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## तंत्रज्ञान विकासामुळे समाजोन्नती व लोककल्याणाला चालना

# नव तंत्रज्ञान विकसित भारतासाठी उपयुक्त - डॉ. सुरेश गोसावी

### शिक्षण विश्व : पीसीसीओईआर येथे पाचव्या एशियाकॉन -25 आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : भारतात ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञानाचा विकास आणि वापर केला जात आहे. समाजोन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या तंत्रज्ञानाचा विकास केल्यामुळे लोक कल्याणकारी व्यवस्था निर्माण करण्यासाठी मदत मिळते. गरजेनुसार तंत्रज्ञान विकसित होत असून यामुळे देश प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे. नव तंत्रज्ञान विकसित भारतासाठी उपयुक्त ठरते आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केले..**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड रिसर्च (पीसीसीओईआर) आणि आयईईई यांच्या सहयोगाने आयोजित केलेल्या पाचव्या 'एशियाकॉन -२५' आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन डॉ. गोसावी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सावी इन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक डॉ. विकास पाटील, आयईईईचे डॉ. शशिकांत पाटील, कॅपजेमिनीचे मोनिश के., उद्योजक नरेंद्र लांडगे, पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरिश तिवारी, डॉ. राहुल मापारी, डॉ. विजयालक्ष्मी कुंभार आदी उपस्थित होते. यावेळी 'एशियाकॉन' स्मरणिकेचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले.

या परिषदेसाठी सोळा देशांमधून आलेल्या दोन हजार २६२ प्रवेशिकां मधून २५६ शोध निबंधांचे सादरीकरण करण्यात आले, असे डॉ. राहुल मापारी यांनी प्रास्ताविकात सांगितले.

अशाप्रकारच्या परिषदे मधून संशोधकांना विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगतीची माहिती होते. नवकल्पना, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, विचारांची देवाणघेवाण होते. पुढील वाटचालीसाठी योग्य दिशा मिळते. आव्हानांचा सामना करत त्यावर मात करा, असे मार्गदर्शन डॉ. विकास पाटील यांनी केले.

'आयईईई'ने संशोधकांना व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्थेचा नावलौकिक खूप मोठा आहे. पीसीईटीच्या सहयोगाने पाच वर्षांपासून आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन केले जात आहे, यांचा आनंद आणि समाधान आहे असे डॉ. शशिकांत पाटील म्हणाले.

डॉ. हरिश तिवारी यांनी परिषदेच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी विविध विद्याशाखेचे प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. मैथिली अंधारे यांनी केले. आभार डॉ. संतोष रणदिवे यांनी मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करून परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या.

## गुणवंत विद्यार्थ्यांच्या बक्षिसासाठी एक कोटींचा खर्च

### महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची स्थायी समितीच्या बैठकीमध्ये मान्यता

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेच्या माध्यमिक शाळांमध्ये दहावीच्या परीक्षेमध्ये ८० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस दिले जाते. त्यानुसार २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी १ कोटी ६ लाख ७५ हजार रुपयांचा खर्च येणार आहे. त्यास महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायी समितीच्या बैठकीमध्ये मान्यता दिली.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने महापालिका शाळेत शिक्षण घेत असलेल्या व दहावीच्या परीक्षेमध्ये चांगले गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान केला जातो. त्यांना प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामध्ये ९० टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळाल्यास एक लाख रुपयांचे बक्षिस दिले जाते. तसेच ८५ ते ८९ टक्के गुण मिळाल्यास ५० हजार रुपये व ८० ते ८४.९९ टक्के गुण मिळाल्यास २५ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. त्यानुसार, १ लाखाचे मानकरी २८ विद्यार्थी ठरले आहेत. तर ५० हजार रुपये रक्कम ८२ विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच १३५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. तर ८ दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे बक्षिस दिले जाणार आहे. त्यासाठी १ कोटी ६ लाख ७५ हजार रुपये खर्च होणार आहे.

ही रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट देण्यात येणार आहे. ही योजना फक्त महापालिका शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठीच आहे.

## शिक्षण विश्व: पीसीईटी शैक्षणिक संकुलात नवव्या 'आयसीसीयुबीईए

# तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अनेक संधी - प्रा. राव तुमाला

## 25' आणि चौथ्या 'आयमेस-25' आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दहा पंधरा वर्षांत भारताने विज्ञान - तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने विकास केला आहे. नवकल्पना, निर्मिती, उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्तेचा खुबीने वापर केला जात आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत, असे प्रतिपादन मायक्रो इलेक्ट्रॉनिक पॅकिंग इनोव्हेशन्सचे पुरस्कर्ते प्रा. राव तुमाला यांनी केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित निगडी येथील शैक्षणिक संकुलातील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे नवव्या 'आयसीसीयुबीईए-२५' आणि चौथ्या 'आयमेस-२५' या दोन आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. ही परिषद दोन दिवसांची असून 'संगणन, संप्रेषण, नियंत्रण आणि ऑटोमेशन' तसेच 'यांत्रिक अभियांत्रिकी मधील नवकल्पना' या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सादरीकरण, चर्चा होणार आहे. याप्रसंगी प्रा. तुमाला यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी आयईईईचे पुणे विभागीय प्रमुख डॉ. अमर बुचडे, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. नीलकंठ चोपडे, 'आयसीसीयुबीईए-२५' जनरल चेअर डॉ. जयश्री कट्टी, 'आयमेस-२५'जनरल चेअर डॉ. नरेंद्र देवरे आदी उपस्थित होते.

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने समाजाला चांगल्या सेवा मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी नवकल्पना, संशोधनाला चालना मिळावी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संवाद साधला पाहिजे, या हेतूने आयईईई काम करत आहे. पीसीसीओई मध्ये आज होत असलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये संगणन, संप्रेषण, ऑटोमेशन तसेच यांत्रिक अभियांत्रिकी'चे विषय निवडण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना भविष्यात याचा मोठा फायदा होईल, असे मत डॉ. अमर बुचडे यांनी व्यक्त केले.

या परिषदेसाठी देशासह सोळा देशांमधून बाराशे चाळीस प्रवेशिका आल्या. त्यामधून २१४ शोध निबंधांची निवड करून त्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे, असे डॉ. जयश्री कट्टी यांनी सांगितले. 'आयमेस' साठी २६० प्रवेशिकां मधून १२० शोध निबंधांची निवड करण्यात आली, असे डॉ. नरेंद्र देवरे यांनी सांगितले.

डॉ. गोविंद कुलकर्णी म्हणाले, की संशोधकांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन देऊन व्यासपीठ मिळवून देण्यासाठी; तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधकांशी ओळख होण्यासाठी ही परिषद उपयुक्त आहे.

यावेळी परिषदे विषयी माहिती असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. या परिषदेसाठी विविध देशांतील प्रतिनिधी, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. अंजली श्रीवास्तव, डॉ. संदीप पाटील यांनी केले. आभार डॉ. स्वाती जगताप यांनी मानले.


पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करून परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या.

# मोहननगर परिसरात वारंवार वीज खंडित

## नागरिक संतप्त; भोसरी विभागीय कार्यालय महावितरणला निवेदन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**



मोहननगर परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. याविरोधात नागरी हक्क कृती समितीच्या वतीने भोसरी विभागीय कार्यालय महावितरणला निवेदन दिले आहे. महावितरणचा गलथान आणि नियोजनशून्य कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली. मोहननगरमधील वीज प्रश्नाबाबत शिष्टमंडळाने भोसरीचे उपअभियंता एस. एस. क्षीरसागर यांना निवेदन दिले. त्यावेळी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, संजय जगताप, माधव निर्लेकर, महेश पंडित आदी उपस्थित होते. कार्यकारी अभियंता अतुल देवकर यांच्याशीही चर्चा झाली.

मोहननगरमधील विद्युत रोहित्रावर भार अधिक असल्यामुळे उच्च दाब वाहिनीवर ताण येतो आणि त्यामुळे वारंवार समस्या येत आहेत. मोहननगर परिसरात वीजपुरवठा सतत खंडित होत आहे. विद्युत रोहित्राच्या जागेवर झाड, झुडपे आणि गवत वाढलेले आहे. या परिसराचा समावेश भोसरी विभागात नवीन जोडल्यामुळे कर्मचाऱ्यांची आणि शिडी गाडीची संख्या अपुरी आहे, ज्यामुळे कर्मचारी वेळेवर पोहोचू शकत नाहीत. लघुदाब वाहिनी (एलटी) व फीडर बॉक्स यांचा सर्व्हे करण्याची गरज आहे.


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
A NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046